जा.क्र. 2017/679 /चंद्रपुर /प्रसिध्दी/कावि/
जिल्हाधिकारी कार्यालय,चंद्रपुर दि.28.12.17

# जाहिरात

(कलम 4 नियम 3,4

भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चा नियम 4 अंतर्गत व नियम 2014 च्या नियम 3 नुसार चंद्रपुर जिल्हातील विविध प्रकल्पासाठी जमीनीचे भुसंपादन करण्यापुर्वी प्रकल्पबाधीत क्षेत्रातील बाधीत होणा-या कुटुंबाचे सामाजिक परिणाम अभ्यास करण्यासाठी व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना तयार करण्यासाठी मान्यता प्राप्त विदयापिठ/शासकिय महाविदयालय/ सामाजिक कार्यविभाग/समाज शास्त्र शाखा/अर्थशास्त्र शाखा यापैकी कोणत्याही प्रशिक्षण विदया शाखा किंवा यासारख्या शासकीय संस्था किंवा अशासकीय संघटना व व्यवसायिक संस्था (किंवा अशासकिय संघटना व व्यवसायिक संस्था ) यांच्याकडुन सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अहवाल व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना करण्यात येणार आहे. यासाठी खालील पात्रता पुर्ण करणा-या विदयापिठ/ /शासकिय महाविदयालय/ सामाजिक कार्यविभाग/समाज शास्त्र शाखा/अर्थशास्त्र शाखा व अशासकीय संघटना / व्यवसायिक संस्था यांचेकडुन नियम 4 अन्वये जाहिरातव्दारे अर्ज मागविण्यात येत आहे.

खालील पात्रता पुर्ण करणा-यांनी दिनांक 12/01/2018 रोजी संध्याकाळी 5.00 वाजेपर्यत मुख्य भुसंपादन अधिकारी (जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपुर) यांचे कार्यालयात अर्ज दाखल करावे.

पात्रता:-

1)संबंधीत विद्यापीठ /महाविद्यालय/विद्यशाखा हे शासन मान्यताप्राप्त असावी.

2)संबंधीत अशासकीय सघटना/व्यावसायीक संस्था/शासकीय संस्था ही नोंदणीकृत असावी.

3)सामाजिक मान्यता किंवा नोंदणी ही या जाहीरातीपुर्वी 3 वर्षे पुर्ण झालेली असावी.

4)सामाजिक परिणाम अभ्यास करण्यासाठी व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना यांच्या कामाचा कमीतकमी 3 वर्षाचा अनुभव असावा.

5)संबंधित संस्थेचे शासनमान्य लेखा परिक्षणाकडुन 3 वर्षाचे लेखा परिक्षण केलेले असावे.

6)या कामासाठी योग्य ते प्रशिक्षीत मनुष्यबळ, प्रशिक्षणासाठी इमारत,फर्निचर, कार्यालय, वाहन व्यवस्था इत्यादी संस्थेच्या मालकीचे असावे व ते अद्यावत असावे.

7)अर्जाचे नमुना हा www.chanda.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जिल्हाधिकारी चंद्रपुर करीता

भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापन करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 कलम 4 अंतर्गत सामाजिक परिणाम निर्धारण (SIA)अभ्यास करण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

| | |
|---|---|
| 1)मान्यता प्राप्त संस्थेचे नाव | :- |
| 2)नोंदणी क्रमांक व दिनांक | :- |
| 3)नोंदणी 3 वर्षापुर्वीची आहे काय ? | :- होय/ नाही (तपशिल जोडावा |
| 4)सामाजिक परिणाम अभ्यास करण्यासाठी व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना यांच्या कामाचा अनुभव आहे काय ?किती वर्ष ? | :- होय (तपशिल जोडावा)<br>नाही |
| 5)संबंधीत संस्थेचे शासन मान्य लेखापरिक्षकांकडुन मागील 3 वर्षाचे लेखा परिक्षण केलेले आहे काय ? | :- होय (तपशिल जोडावा)<br>नाही |
| 6)संस्थेकडेस प्रशिक्षीत मनुष्यबळ, ईमारत,कार्यालय व वाहन व्यवस्था आहे काय? | :- होय (तपशिल जोडावा)<br>नाही |
| उपरोक्त अभ्यास करण्यासाठी संस्था निश्चित करणे, अटी-शर्ती नियम यात बदल करण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी साहेब चंद्रपुर यांचेकडील राखीव आहेत.<br>विमाका/चंद्रपुर/जाहि/ / | अध्यक्ष/सचिव |